# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१८० दिनांक - १०/०५/२०२४

## रात्रौ घरफोडी करुन चोरी करण्याऱ्या सराईत आरोपीत यास अटक करुन २२७.८७ ग्रॅम सोन्याचे दागिने, रोख रक्कम, मोबाईल फोन व ॲक्टिव्हा मोटारसायकल असा एकुण १२,२२,६५०/- रु किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यास माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण पथकास यश

माणिकपुर पोलीस ठाणे हद्दीमध्ये दिनांक १५/०४/२०२४ रोजी १६.०० वा. ते २१.५०वा. चे दरम्यान रुम नं. ०४, सिल्वर सॅन्ड सोसायटी, शास्त्रीनगर, वसई पश्चिम, जि. पालघर येथील बंद घराचे किचनमधील लोखंडी खिडकीचे ग्रील कोणीतरी अज्ञात चोरटयाने कशाचेतरी साहाय्याने तोडुन स्लायडिंग उचकटुन त्यावाटे आतमध्ये प्रवेश करुन बेडरुममधील कपाटातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम घरफोडी करुन चोरी झालेबाबत तक्रारदार नामे श्री माधवराव भिमराव वाडीकर, वय ५० वर्षे, यांनी दिलेल्या तक्रारीवरुन माणिकपुर पोलीस ठाणे गु.र.क्र. १३१/२०२४ कलम ४५४,४५७,३८० भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन मा. वरिष्ठांनी दिलेल्या सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे माणिकपुर गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुन्हयाचे घटनास्थळी भेट देवुन गुन्हयाचे घटनास्थळावर कुठल्याही प्रकारचे सी.सी.टी.व्ही फुटेज उपलब्ध नसतांना आजुबाजुचे सोसायटीचे सी.सी.टी.व्ही कॅमेरे तपासुन त्याव्दारे आरोपीत याचा मागोवा घेवुन आरोपीत वर्णन प्राप्त करुन आरोपीत नामे आतिष दत्ताराम साखरकर, वय ३६ वर्षे, सध्या रा. विरार रेल्वे स्टेशन फिरस्ता, मुळ रा. रुम नं. १०३, बिल्डींग नं. ४, जानकी नगर बिल्डींग, तबेलाच्या बाजुला, फुलपाडा, विरार पुर्व, जि. पालघर यास वसई पश्चिम परिरातुन ताब्यात घेवुन अटक करण्यात आली आहे. अटक आरोपीत याचेकडे कौशल्याने विचारपुस करता त्याने बोरिवली व विलेपार्ले परिसरात अशा प्रकारे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अटक आरोपीत याचेकडुन रु ११,४४,५५०/- किंमतीचे २२७.८७ ग्रॅम सोने, रु ५२००/- रोख रक्कम, ०३ मोबाईल फोन व गुन्हयात वापरलेले वाहन असा एकुण अं.किं.रु १२,२२,६५०/- चा मुद्देमाल हस्तगत करुन एकुण ०६ गुन्हयांची उकल करण्यात आली आहे.

**<u>अटक आरोपीकडुन उघडकीस आलेले गुन्हे :-</u>**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | माणिकपुर पोलीस ठाणे | गु.र.क्र. १३१/२०२४ कलम ४५४,४५७,३८० भा.दं.वि. |
| २. | एम.एच.बी. कॉलनी पोलीस ठाणे | गु.र.क्र. ९४/२०२४ कलम ३८०,४५४,४५७ भा.दं.वि. |
| ३. | विलेपार्ले पोलीस ठाणे | गु.र.क्र. ३४/२०२४ कलम ३८०,४५४,४५७ भा.दं.वि. |
| ४. | विलेपार्ले पोलीस ठाणे | गु.र.क्र. ९१/२०२४ कलम ३८०,४५४,४५७ भा.दं.वि. |
| ५. | जुहु पोलीस ठाणे | गु.र.क्र. ३८५/२०२४ कलम ३८०,४५४,४५७ भा.दं.वि. |
| ६. | उमरगांव पोलीस ठाणे गुजरात | गु.र.क्र. ०८/२०१३ कलम ३४,१२० ब, ३४३,३५५,४११,४५२ भा.दं.वि. आर्म ॲक्ट २५ |

अटक आरोपीत याचा गुन्हे अभिलेख तपासले असता इकडील आयुक्तालयाच्या तसेच मुंबई आयुक्तालयाच्या व पोलीस अधिक्षक पालघर अभिलेखावर एकुण ५७ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले/श्रिंगी, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ०२, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त वसई, श्री. राजु माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संतोष चौधरी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण अधिकारी पो.उ.नि. सनिल पाटील, पो.ह. शैलेश पाटील, पो.ह. शामेश चंदनशिवे, पो.ह. धनंजय चौधरी, पो.शि. गोविंद लवटे, पो.शि. आनंदा गडदे, पो.शि. प्रविण कांदे, म.पो.शि. पुजा कांबळे व पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ ०२ चे पो.ह. भालचंद्र बागुल, पो.शि. अमोल बर्डे, यांनी यशस्विरीत्या पार पाडली आहे.